**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २०८ । मंगळवार १२ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


## कॅम्प पोलिसांचे एमआयडीसी हद्दीत ४ बिंगो जुगार अड्ड्यांवर छापे

### एपीआय जगदीश मुलगीर यांनी काढले एमआयडीसीच्या कारभाराचे वाभाडे

**पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अवैध धंदे बंद करण्याच्या सुचना देऊनही एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्डे सुरू होते. वास्तविक पाहता एमआयडीसी पोलिस ठाणे हे ग्रामीणशी निगडीत आहे. परंतु शहर विभागाचे उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्प पोलिसांना एमआयडीसी हद्दीत छापे टाकुन कारवाई करण्याचे आदेश देणयात आले. या कारवाईमुळे एमआयडीसी हद्दीतील माणिकरावांच्या कारभाराचे वाभाडे निघाले आहे.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळया जुगार अड्डयांवर पोलिसांनी छापे छापे टाकून ६ लाख ३५ हजार ८५० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असून १९ आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन हे जिल्ह्यात रुजू झाल्या पासून शहरालगत ही दुसरी क्रॉस रेड आहे. त्यमुळे अवैध व्यावसायीकांचे धाबे दणाणुन गेले आहे.

गांधीनगर बोल्हेगाव येथील आंबेडकर चौकातील बिंगो जुगारावर छापा टाकण्यात आला. यावेळी १ लाख २१ हजार २०० रुपयांचा ऐवज त्यामध्ये टी.व्ही,एक्सट्रीस कंपनीचा वायफाय फोन पे मशीन, बॅनर, मोबाइन असा ऐवज जप्त करण्यत आला आहे. त्यानंतर दुध डेअरी चौकातील शेउी बायपास रस्यावरील मातोश्री हॉटेल शेजारी एका पत्र्याच्या शेडमध्ये बिंगो जुगारावर छापा टाकण्यात आला. त्यामध्ये ९ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून ४० हजार रुपये रोख, लॅपलॅाप,टिव्ही स्क्रिन किबोर्ड, फोन पे मशीन, आकडे असलेला बॅनर,असा २ लाख ३६ हजार रुपये किमतीचा ऐजव असा जप्त करण्यात आला आहे. याच मार्गावरील हॉटेल भाग्यश्री जवळील पत्र्याच्या शेडमध्ये बिंगो या जुगाराचाच्या अड्डयावर छापा टाकण्यात आला. यावेळी ५ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्याकडून १ लाख ४९ हजार रुपये किमतीचा ऐजव जप्त करण्यात आला आहे. तर चौथा नवनागापुर येथील दुध डेअरी चौकातील पत्र्याच्या शेडमध्ये चालणाऱ्या जुगार अड्डयावर छापा टाकून कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ४ आरोपींकडून १ लाख २८ हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला. त्यामध्ये मॉनिटर, ३ प्रिंटर, स्कॅनर, मोबाई, व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. सदरची कारवाई ही पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक दिपक टिपरसे, सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश टिपरसे, उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, योगेश पवार, निसार शेख, अंमलदार रवींद्र टकले, दिपक शिंदे, नंदकुमार पठारे, प्रमोद लहारे, इस्माईल पठाण, रामनाथ डोळे, कैलास शिरसाठ, पोपट देव्हारे यांनी केली.

## १३ वर्षांनी जुळला शनिअमावास्या, शनिवार आणि शनिजयंतीचा दुर्मिळ योग

### अहिल्यानगरातील प्राचीन स्वयंभू शनिमारुती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वयंभू शनिमारुती देवस्थान येथे शनिवार दि. १६ मे २०२६ रोजी वैशाख कृष्ण अमावास्या, शनिवार आणि भगवान शनिदेवांचा जन्मोत्सव असा त्रिवेणी महापुण्यपर्वकाळ योग तब्बल १३ वर्षांनी जुळून आल्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रामचंद्र खुंट परीसरातील शनी गल्ली येथील प्राचीन स्वयंभू शनिमारुती मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाते.

मंदिरात सकाळी ७ वाजता श्री शनि महाराजांच्या मुख्य गाभाऱ्यात सामूहिक महाअभिषेक, जलाभिषेक, पंचद्रव्याभिषेक, तैलाभिषेक तसेच जपअनुष्ठान होणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता लघुरुद्राभिषेक, महापूजा व मध्याह्न आरती पार पडेल. दुपारी १ वाजता होमहवन व पूर्णाहुतीने धार्मिक विधींची सांगता होईल.

सायंकाळी ७ वाजता सूर्यास्तसमयी श्री शनिमहाराजांचा जन्मोत्सव सोहळा व महाआरती होणार असून त्यानंतर सायं ७.३० ते ९.३०



या वेळेत महाप्रसाद व मुक्तहस्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९.३० वाजता हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रम होणार आहे.

अहिल्यानगरातील अनेक प्राचीन मंदिरांपैकी शनी गल्ली येथील स्वयंभू शनिमारुती मंदिराला विशेष धार्मिक महत्त्व आहे. मंदिरातील शनि व मारुती यांच्या मूर्ती स्वयंभू म्हणजे स्वयंप्रकट झालेल्या असल्याची श्रद्धा भाविकांमध्ये आहे. पूर्वी येथे वैष्णव बैरागी संप्रदायातील साधुसंत वास्तव्यास होते. त्यांनी अनेक वर्षे कठोर साधना व भक्ती केल्यानंतर शनिमारुती भगवानांनी त्यांना सगुण रूपात दर्शन दिल्याची आख्यायिका तसेच भक्तांच्या कल्याणासाठी भगवान शनिमारुती येथेच स्थिरावले असून भक्तिभावाने पूजा, अर्चा, अभिषेक व जप करणाऱ्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, पीडा–बाधा व दोषांचे निवारण होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. आजही अनेक भाविकांना या स्थानाचा आध्यात्मिक अनुभव येत असल्याचे सांगितले जाते.धार्मिक मान्यतेनुसार प्रभू श्रीरामांच्या कृपेने कलियुगात मारुतीराया अजर–अमर मानले जातात. रावणाच्या बंदीवासातून नवग्रहांची मुक्तता केल्यानंतर शनिदेवांनी मारुतीरायांच्या पूजेला विशेष महत्त्व दिल्याची आख्यायिका आहे. त्यामुळे शनि व मारुतीची संयुक्त पूजा केल्यास शनीसाडेसाती, शनिमहादशा व इतर ग्रहबाधा कमी होतात, अशी श्रद्धा व्यक्त केली जाते.

ज्योतिषशास्त्रानुसार शनिदेव हे कर्मफलदाता व न्यायाधीश मानले जातात. मनुष्याच्या कर्मानुसार शुभ–अशुभ फळ देण्याचे कार्य शनिदेव करतात, अशी धार्मिक धारणा आहे. त्यामुळे शनिअमावास्या व शनिजयंतीला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्री शनि सेवा संघ तसेच सर्व सेवेकरी भक्तवृंद यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




## दै. आकर्षण निवडक

### पू श्री कुंदनऋषिजी म सा - समता शिरोमणी पदाने अलंकृत



आनंदधाम - राष्ट्रसंत आचार्य सम्राट प पू श्री आनंदऋषिजी म सा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आनंदधामच्या प्रांगणात आचार्य भगवंतांचे ज्येष्ठ सुशिष्य मौनसाधक महाश्रमण पूज्य गुरुदेव श्री कुंदनऋषिजी म सा यांचा ६५ वां दीक्षादिवस महोत्सव चतुर्विध संघाच्या उपस्थितीत संपन्न झाला. मंगलाचरण व नवकार महामंत्र जाप, आनंद धून ने गुरु गुणानुवाद सभेची सुरुवात झाली. श्री सुजिज्ञाजी म सा, श्री विनितदर्शनाजी म सा या साध्वींनी सुंदर भजन द्वारा प्रवर्तकश्रीजीं च्या संयमी जीवनाचे गुणगान केले.श्री दिव्ययशाजी म सा, श्री अर्चनाजी म सा, श्री सत्यप्रभाजी म सा इत्यादी साध्वीजींनी आपल्या शुभकामना मनोगत मध्ये सांगितले की, प्रवर्तकश्रीजीं नी आनंद गुरु च्या चरण मध्ये समर्पित होऊन संयमी जीवन सार्थक केले. यथा नाम तथा गुण कार्य करुन आपले जीवन कुंदन प्रमाणे प्रकाशित केले. सेवा, समता, सहजता, मधुरता, समर्पणता, सहनशीलता इत्यादी गुण संपदा मुळे गुरुदेव पूजनीय बनले. प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म सा, यांनी प्रवर्तकश्रीजीं च्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी म सा, यांची सेवा, गुरु प्रति त्यांची निष्ठा - भक्ति ही अनन्य साधारण होती. स्थिरता, देह प्रति अनासक्त भाव असल्यामुळे ९२ व्या वर्षाच्या बुजुर्ग अवस्थेत ही प्रवर्तकश्रीजी एका जागेवर स्थिर बसून आहेत, हे सांगत श्री आदर्शऋषिजी म. नी गुण अनुमोदना केली. अनुमोदना संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा, यांनी आपल्या सूत्र संचालन द्वारे गुरु विषयी श्रध्दा, आत्मीयता भाव व्यक्त केले. श्रावक संघा तर्फे श्री संतोषजी गांधी यांनी प्रवर्तकश्रीजींना दीक्षादिवसाच्या शुभेच्छा दिल्या. श्रीमती सक्करबाई मेहेर, मनिषाजी मुनोत, देशना चुत्तर यांनी प्रवर्तक गुरुदेवांना दीक्षादिवस ची हार्दिक शुभेच्छा दिल्या. पूज्य गुरुदेवांचे जीवन विशेषतः समता, सहनशीलता गुणाने ओतप्रोत भरलेले आहे. कोणत्याही परिस्थितीत न डगमगता ते पूर्ण मनोबलाने कठीण प्रसंगात धीर - गंभीर राहतात. आबालवृध्द असो किंवा गरीब - श्रीमंत, सर्वांबरोबर आपुलकी, जिव्हाळा ही त्यांची विशेषता आहे. आनंद कुल च्या सर्व साधु - साध्वींजींच्या वतीने महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा, यांना आदरची चादर अर्पण करुन त्यांना *समता शिरोमणी उपाधि ने अलंकृत केले. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर शहर तसेच अन्य क्षेत्रातून हजारो श्रावक - श्राविका उपस्थित होते. त्यांनी दीर्घ दीक्षा पर्याय असलेल्या पूज्य गुरुदेवांच्या संयमी जीवनाची अनुमोदना केली. १३ मे, बुधवार रोजी पिंपळगाव बसवंत येथिल सुश्राविका श्रीमती विजयाबाईजी कोचर, यांची जैन भागवती दीक्षा सकाळी १० :३० वाजता संपन्न होणार आहे. तरी दोन्ही दिवशी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून बंधु - भगिनींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर च्या वतीने करण्यात आले आहे.

### ढवळपुरीतील सतलोक आश्रम जमीन व्यवहाराची नोंद नामंजूर

अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील लष्करी सरावासाठी आरक्षित क्षेत्रात सुरू असलेल्या कथित विनापरवाना शेड बांधकाम आणि आदिवासी जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावरून मोठा वाद निर्माण झाला होता. या प्रकरणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीनंतर तहसीलदार कार्यालयाकडून संबंधित जमीन व्यवहाराची नोंद नामंजूर करण्यात आल्याचे लेखी पत्र देण्यात आले आहे. मात्र या प्रकरणात चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी संघटना उपोषणावर ठाम असून, लवकरच उपोषण करणार असल्याची माहिती समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिली. या संदर्भात संघटनेच्या वतीने लेखी तक्रार करण्यात आली होती. ढवळपुरी परिसरातील अनेक गट लष्करी सरावासाठी आरक्षित आहेत आणि या भागात नियमितपणे मोठ्या प्रमाणावर सराव केला जातो. अशा परिस्थितीत गट क्रमांक ११२०/२ मधील जागेवर मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट, कुरुक्षेत्र (हरियाणा) यांच्या सतलोक आश्रमाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर शेड बांधकाम सुरू करण्यात आले आहे. हे बांधकाम आवश्यक परवानग्या न घेता करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

# शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी शासन–शिक्षक संवाद गरजेचा – प्रसाद शिंदे

**शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे शिक्षक सेनेकडून स्वागत; शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा**
**अहिल्यानगर दौऱ्यात शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधले; शिक्षकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिकेचे आश्वासन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे हे अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता शिक्षक सेनेच्या वतीने त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी श्रीराम खाडे, ललित वकचौरे, राजेंद्र सोनवने आदी मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांपासून शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेपर्यंत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींसह विद्यार्थ्यांच्या हिताच्या अनेक विषयांकडे शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेत शिक्षकांना येणाऱ्या प्रशासकीय अडचणी, शाळांमधील मूलभूत सुविधांची गरज, ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना यावरही चर्चा झाली.

शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी शिक्षकांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्या सोडविण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित बाबींवर लक्ष देण्याचे आश्वासन दिले. शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांच्या समस्या समजून घेत त्यावर योग्य तो तोडगा काढण्यासाठी शासन पातळीवर आवश्यक प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी शासन आणि शिक्षक संघटनांमध्ये सातत्यपूर्ण व सकारात्मक संवाद होणे आवश्यक असल्याची भावना प्रसाद शिंदे यांनी व्यक्त केली. शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण व्यवस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समन्वयातून काम होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पाचोडच्या जनावर बाजारात बैलजोड्यांची जोरदार खरेदी–विक्री



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** महाराष्ट्रातील प्रसिद्ध जनावर बाजार म्हणून ओळख असलेल्या पाचोड येथील रविवारी भरणाऱ्या बाजारात सध्या मोठी गर्दी होत आहे. खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकरी शेतीकामासाठी बैलजोड्या खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे बाजारात बैलजोड्यांच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार जोरात सुरू असून चांगल्या जातीच्या बैलजोड्यांना मोठी मागणी निर्माण झाली आहे.

यंदा शेती मशागतीसाठी सक्षम व ताकदवान बैलजोड्यांची मागणी वाढल्याने त्यांच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. दर्जेदार बैलजोड्यांसाठी शेतकरी लाखोंची बोली लावत असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे. पाचोड बाजारात मराठवाड्यासह नगर, जालना, बीड आदी जिल्ह्यांतून व्यापारी व शेतकरी दाखल होत असून बाजारात मोठी उलाढाल होत आहे.

दरम्यान, खरीप हंगामासाठी वेळेत बैलजोडी उपलब्ध व्हावी यासाठी अनेक शेतकरी बाजारात गर्दी करत आहेत. पारंपरिक शेती पद्धती जपणाऱ्या शेतकऱ्यांकडून बैलजोडीला अजूनही मोठे महत्त्व दिले जात असल्याचे चित्र पाचोडच्या बाजारातून पाहायला मिळत आहे.

# चनकवाडीतील गायरान अतिक्रमणधारकांचे घरकुल नियमाकुल करण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील चनकवाडी ग्रामपंचायत हद्दीतील गायरान गट क्रमांक १३ मधील अतिक्रमणधारक पात्र लाभार्थींनी २०११ पूर्वीच्या निवासी घरकुलांचे नियमाकुल करण्याची मागणी करत तहसीलदार तसेच पंचायत समिती सभापती यांना निवेदन सादर केले.

शासन निर्णयानुसार २०११ पूर्वी अस्तित्वात असलेल्या निवासी घरकुलांना नियमाकुल करण्याची प्रक्रिया तातडीने राबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी गायरान जमिनीवर वास्तव्यास असलेल्या अनेक कुटुंबांनी आपली व्यथा मांडत घरकुलांना कायदेशीर मान्यता मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

निवेदन देताना मोठ्या संख्येने माता–भगिनींसह पात्र पुरुष लाभार्थी उपस्थित होते. संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात आली.

# महिलांच्या नेत्र तपासणीने मातृत्व दिवस साजरा

**फिनिक्स फाऊंडेशनतर्फे नेत्र तपासणी शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मातृत्व दिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजातील ज्येष्ठ महिला, गरजू नागरिकांचा या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित या शिबिरात नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. अनेक महिलांनी यावेळी नेत्रदान व अवयवदानाचा संकल्प करत सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. या शिबिराचे उद्घाटन उपस्थित महिलांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे विशाल भिंगारदिवे, ग्रामस्थ, महिला व फिनिक्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे म्हणाले की, ''मातृत्वाचे ऋण कोणत्याही स्वरूपात फेडता येत नाही. आई आपल्या मुलांसाठी आयुष्यभर त्याग, प्रेम आणि संघर्ष करत असते. तिचे उपकार अनंत असतात. मातृत्व दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून, आईच्या आरोग्याची काळजी घेण्याचा आणि तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. समाजातील अनेक माता आणि ज्येष्ठ महिला स्वतः च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. ग्रामीण भागातील अनेक महिलांना योग्य आरोग्यसेवा वेळेत मिळत नाही. अशा महिलांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने केला जात आहे. माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे. अंधकारमय जीवन जगणाऱ्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य आमची संस्था करत आहे. नेत्रदान आणि अवयवदान ही मानवतेची मोठी सेवा असून, प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत एकूण २७० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ४७ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू व काचबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, राजेंद्र बोरुडे, ओम बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार तसेच फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आमदार अक्षय कर्डिले यांचा हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून सत्कार

**मातृत्व दिनानिमित्त महिलांचा सन्मान अन् वृक्षसंवर्धनाचा संदेश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मातृत्व दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. तसेच राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत विजयी झालेले नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच श्रीमती अलकाताई शिवाजीराव कर्डिले यांच्यासह ग्रुपमधील महिलांचा मातृत्व दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थितांना रोप भेट देऊन अनोख्या पद्धतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ आणि सचिन चोपडा यांच्या हस्ते शाल, स्मृतीचिन्ह, स्मरणिका व रोप देऊन सत्कार करण्यात आला. मातृत्वाचा गौरव, कार्यकर्तृत्वाचा सन्मान आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळाला. यावेळी प्रांजली सपकाळ, शोभाताई मुंढे, संगीता सपकाळ, सुरेखाताई आमले, प्रियंका कर्डिले, मीनाताई परदेशी, आरतीताई बोराडे, मनीषा गायकवाड, आशाताई पराते, वंदनाताई बोधले, जहीर सय्यद, गंगाराम मुंढे, सर्वेश सपकाळ, दिलीप ठोकळ, सचिन पेंढूरकर, अशोक पराते, ईवान सपकाळ, सुभाषराव पेंढूरकर, ताराचंद ठोकळ, इंजि. अनिल सोळसे, अविनाश जाधव, रतन मेहेत्रे, मुन्ना वाघस्कर, नवनाथ वेताळ, सुभाष पेंढुरकर, आनंद सदलापूर, दशरथ मुंडे, अविनाश पोतदार, अभिजीत पराते, एकनाथ जगताप आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सेवानिवृत्त होत असलेले गंगाराम मुंढे व शोभाताई मुंढे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा व ग्रुपमध्ये असलेल्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला.

ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले की, ''माता ही प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रेरणास्थान असते. मातेच्या प्रेरणेने मुले घडत असतात. श्रीमती अलकाताई कर्डिले यांच्या संस्काराने तिन्ही मुलींनी शहराच्या समाजकारण, राजकारणात योगदान देऊन अहिल्यानगर शहराच्या विकासाला चालना दिली. सध्या त्यांची मुलगी ज्योती गाडे महापौर पद भुषवित आहे. मागील काळात सुवर्णा कोतकर यांनी उपमहापौरपद भूषविले. तसेच शितल जगताप यांनी देखील नगरसेवकपदी काम करुन प्रभागातील प्रश्न सोडविले. तर नुकतेच राहुरी विधानसभेचे आमदार झालेले अक्षय कर्डिले हे स्व. शिवाजीराव कर्डिले यांचा राजकीय व सामाजिक वारसा चालविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मातृत्वाचा सन्मान करणे म्हणजे संस्कारांचा गौरव करणे होय. हरदिन मॉर्निंग ग्रुप सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवत असून, समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य करत आहे. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून, प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन सपकाळ यांनी केले. तर नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांच्या राजकीय व सामाजिक कार्याला त्यांनी शुभेच्छा दिल्या. सचिन चोपडा म्हणाले की, ''मातृत्व दिन हा केवळ औपचारिक उत्सव नसून आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. महिलांचा सन्मान हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. हरदिन मॉर्निंग ग्रुपने कायमच सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन आणि मानवी मूल्ये जपणारे उपक्रम राबविले आहेत. आमदार अक्षय कर्डिले यांच्या विजयामुळे राहुरी मतदारसंघाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मुकुंदनगर येथे हज यात्रेकरूंचा सत्कार

**देशात शांतता राहण्यासाठी विशेष प्रार्थना करणार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हज यात्रेस पोहोचल्यावर मक्का मदिना येथे देशात सुख–समृद्धी व शांतता नांदावी, यासाठी विशेष प्रार्थना करणार असून, बंधुभाव–एकता टिकून राहावी यासाठीही आपण प्रार्थना करणार असल्याचे शेख सज्जादभाई व शेख परवेजभाई यांनी सांगितले.

मुकुंदनगर येथील प्रसिद्ध बिल्डर हाजी रऊफभाई बिल्डर व हाजी सईदभाई यांच्या हस्ते हज यात्रेस जाणारे शेख सज्जाद व शेख परवेज यांचा शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोहम्मद मजहर व इतर मान्यवर उपस्थित होते.

शेख सज्जादभाई म्हणाले, परमेश्वराने मला खूप काही दिले आहे. आता मी निश्चय केला होता की, हज यात्रेस जावे. त्याप्रमाणे तो क्षण प्रत्यक्षात आला आहे, याचा आनंद होत आहे. परमेश्वराने प्रत्येकाला हज यात्रा करण्याची संधी द्यावी, अशी यानिमित्ताने आपण प्रार्थना मक्का मदिना येथे पोहोचल्यावर करू.

# अन्न व पुरवठा नागरी मंत्री नामदार छगन भुजबळ यांची नियुक्ती येथील नंदनवन जाधव फार्म हाऊस येथे सदिच्छा भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी नेप्ती येथील नंदनवन जाधव फार्महाऊसला दिलेल्या सदिच्छा भेटीमुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. या भेटीत शिवसेनेचे दत्ता जाधव यांच्याशी काही काळ बंद खोलीत झालेल्या चर्चेमुळे विविध राजकीय समीकरणांबाबत तर्क–वितर्कांना उधाण आले आहे.

नेप्ती परिसरातील नंदनवन जाधव फार्महाऊस येथे आयोजित या भेटीत भुजबळ यांनी जाधव कुटुंबीयांशी आत्मीय संवाद साधत विचारपूस केली. या वेळी वातावरण अतिशय उत्साहपूर्ण व आपुलकीचे होते. राजकीय चर्चांसोबतच कौटुंबिक स्नेहाचे दर्शनही या भेटीत घडले.

या प्रसंगी जाधव परिवाराच्या वतीने नामदार छगन भुजबळ यांचा पुष्पगुच्छ देऊन व शाल–श्रीफळ देत भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी बाबासाहेब जाधव, शिवसेनेचे दत्ता जाधव, माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव, नेप्ती गावचे सरपंच अंबादास पुंड, आदेश जाधव, हिरा सेठ जाधव, राज जाधव, हेमंत जाधव, हिमांशू जाधव, अश्विन जाधव, अभिजीत दळवी, बाळासाहेब कोल्हे, विकास सपाटे, ओंकार शेळके, अंजली जाधव, शुभम कोल्हे, शितल जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी देशव्यापी बंद




अहिल्यानगर- देशभरात वाढत चाललेल्या बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीला विरोध करत तसेच कार्पोरेट कंपन्यांकडून निर्माण करण्यात येणाऱ्या अव्यावसायिक स्पर्धे विरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने () दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंदची घोषणा केली आहे. एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ स. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा बंद पुकारण्यात आला असून, जिल्ह्यातील सर्व केमिस्ट बांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी केले आहे. औषध व्यवसाय हा १९४० व १९४५ अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र, ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात या कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याचे संघटनेने नमूद केले आहे. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून औषध विक्रीसंदर्भात दि. २८ ऑगस्ट २०१८ रोजी ८१७() अंतर्गत अधिसूचना काढली होती. परंतु, त्या अधिसूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणात ऑनलाईन औषध विक्री सुरू असल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल असून, न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिल्याचेही संघटनेने स्पष्ट केले. मात्र, याकडे सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत एआयओसीडीने संबंधित जीएसआर अधिसूचना रद्द करण्याची मागणी केली आहे.कोरोना काळात नागरिकांना सुविधा मिळावी यासाठी केंद्र सरकारने दि. २६ मार्च २०२० रोजी २२०() अंतर्गत औषधांच्या होम डिलिव्हरीस विशेष परवानगी दिली होती. मात्र, कोरोनाचा कालावधी संपून पाच वर्षे उलटूनही ही अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. या सवलतीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भागभांडवल वापरून मोठ्या प्रमाणावर सवलती देत औषध विक्री करत असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला आहे.संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले की, () २०१३ नुसार जीवनावश्यक औषधांवर होलसेलरला ८ टक्के व रिटेलरला १६ टक्के नफा निश्चित करण्यात आला आहे.

### नवगाव जि.प. उर्दू प्रशालेचा दहावीला शंभर टक्के निकाल

पैठण - तालुक्यातील नवगाव येथील जि.प. उर्दू प्रशालेने दहावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परीक्षेला बसलेल्या सर्व ३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाचा गौरव वाढविला. या निकालात सफुरा सादेक शेख हिने ९० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच परवीन आयेशा जुबेर हिने ८७ टक्के गुणांसह द्वितीय, तर बेगम मसिरा वजीर हिने ८५ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. पठन सलमा नासेर हिने ८३ टक्के गुणांसह चौथा क्रमांक पटकावला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत अल्पावधीत मिळविलेले हे यश प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त होत आहे. निकाल जाहीर होताच गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### सुषमा जाधव - अमर यांचे निधन



अहिल्यानगर - अहिल्यानगर आकाशवाणीच्या माजी उद्घोषिता सुषमा प्रकाशजीत जाधव - अमर यांचे गेल्या आठवड्यात बुधवारी (६ मे) निधन झाले. त्या ६१ वर्षाच्या होत्या. जाधव यांनी अहिल्यानगर -पुणे आकाशवाणी केंद्रात उद्घोषिका म्हणून ३० वर्षे तसेच पत्रकार म्हणूनही काम केले.त्यांना आपटे पत्रकारिता पुरस्कार, ऊर्जिता फाऊंडेशनचा पुरस्कार प्राप्त झाला.दिवंगत कॉ.भास्करराव जाधव यांच्या कन्या,महापालिकेच्या नि.प्रसिद्धी अधिकारी नीलिमा बंडलु यांच्या भगिनी होत. त्यांच्यामागे पती पत्रकार प्रकाशजीत अमर ,मुलगी नताशा, जावई,नातू असा परिवार आहे.

## निरंकारी मिशनच्या वतीने बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीत उद्या ‘समर्पण दिवस’कार्यक्रम

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** मानवतेच्या कल्याणासाठी एखाद्या महान आत्म्याचे संपूर्ण जीवन समर्पित झाले की, त्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती या केवळ इतिहासापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या युगानुयुगे जनमानसाला प्रेरणा देणारा दिव्य स्रोत ठरतात. मानवता, प्रेम, विनम्रता आणि आध्यात्मिक जागृतीचे अद्वितीय प्रतीक असलेल्या युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी यांच्या पावन स्मृतीस समर्पित ‘समर्पण दिवस’ चा सत्संग कार्यक्रम उद्या बुधवार(दि.१३) रोजी संत निरंकारी मिशनच्या वतीने देश–विदेशात साजरा केला जाईल. मुख्य कार्यक्रम आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तथा निरंकारी राजपिताजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होईल. त्यानंतर उपस्थित श्रद्धाळूंना सतगुरु माताजींचे आशीर्वचन श्रवण करण्याची संधी लाभणार आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण निरंकारी मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावर करण्यात येणार असून, जगभरातील श्रद्धाळूंना त्याचा लाभ घेता येणार आहे.

निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सुद्धा उद्या सायं. ७ ते ९ या वेळेत संत निरंकारी सत्संग भवन, मिस्कीनरोड येथे सत्संग–प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितले की,‘समर्पण दिवस’ हा केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस नसून, मानवतेला प्रेम, सेवा, विनम्रता आणि समर्पणाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणाऱ्या त्या दिव्य जीवनदर्शनाला आत्मसात करण्याचा एक पावन पर्व आहे. हा दिवस प्रत्येकाच्या अंतःकरणात ही जाणीव जागृत करतो की, महान आत्मा आपल्या कर्मातून, विचारांतून आणि आदर्शांतून सदैव जिवंत राहतात तसेच युगानुयुगे मानवतेचा मार्ग प्रकाशमान करीत राहतात.

तरी भाविकांनी सत्संग –प्रवचन कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विदर्भातील प्राध्यापक संघटनेचे श्री विशाल गणपती चरणी साकडे

### पदाधिकाऱ्यांनी घेतले श्री विशाल गणपतीचे दर्शन

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या विदर्भ ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर येथील शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणपती मंदिर येथे दर्शन घेऊन प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्न सुटण्यासाठी श्री गणेशाला साकडे घातले. या शिष्टमंडळाने मंदिरात दर्शन घेतले.

दर्शनासाठी आलेल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त तथा संघटनेचे माजी राज्य उपाध्यक्ष प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला. या प्रसंगी विजुक्टाचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, सहसचिव डॉ. अभिजित पोटले, नागपूर शहर सचिव डॉ. गजानन धांडे, महासंघ प्रतिनिधी प्रा. भाऊराव गोरे, चंद्रपूर जिल्हा सचिव डॉ. प्रमोद उरकुडे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रवीण चटप, संघटन सचिव प्रा. धर्मेश मुनघाटे, गडचिरोली जिल्हाध्यक्ष प्रा. विजय कुत्तरमारे, प्रा. पारखी सर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रा. सोपानराव कदम यांच्यासह विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यभरातील प्राध्यापकांच्या समस्या शासन स्तरावर तातडीने सुटण्यासाठी श्री गणेश चरणी प्रार्थना केली. ज्युनिअर कॉलेज प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित मागण्या, सेवाशर्ती, वेतनविषयक प्रश्न, अनुदान, रिक्त पदे, शैक्षणिक सुविधा आणि प्राध्यापकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी या विषयांवर शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर यांनी व्यक्त केली.

प्रा. माणिक विधाते यांनी या संघटनेचे राज्य उपाध्यक्ष म्हणून काम केले असल्याने प्राध्यापकांच्या प्रश्नाची जाणीव आहे. शिक्षण क्षेत्र सक्षम करण्यासाठी प्राध्यापकांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण व्यवस्थेचा कणा असून त्यांच्या समस्या सोडविल्याशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण होऊ शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## मातोश्री उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल ९१ टक्के



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अलफलाह एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित मातोश्री उर्दू हायस्कूल, आलमगीर, नागरदेवळे, अहिल्यानगर या विद्यालयाने दहावीच्या निकालातील यश कायम ठेवत मार्च–२०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत मोठे यश संपादन मिळविले आहे.

मातोश्री उर्दू हायस्कूला दहावीचा निकाल ९१ टक्के लागला असून, मार्च–२०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये ५६ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. यापैकी पठाण शिफा शाहीद हिने ८३.०० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, शेख आमेना अशफाक हिने ८०.६० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आणि शेख जिया जावेद हिने ७७.००टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यशस्वी सर्व विद्यार्थिनींचे संस्थेचे प्रमुख कार्यवाह हाजी शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, मुख्याध्यापक शेख जमीरअहमद इस्माईल तसेच शिक्षक शेख एजाजअहमद अब्दुल कुद्दूस, शेख महेनाज अब्दुस सलाम, खान सफिया सलीम, शेख अंजुम सत्तार आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांच्यासह ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले आहे.

धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय निमगाव वाघाचा पुण्यश्लोक

## अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्कार कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना जाहीर

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** स्व पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.. श्री पुण्यश्लोक अहिल्यादेवी राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्कार, कथा लेखक बाळासाहेब देशमुख यांना जाहीर झाल्याचे पत्र संस्थेचे अध्यक्ष, संयोजक पै.नाना डोंगरे यांनी दिले.

सदर पुरस्कार..०६वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, निमगाव वाघा येथे १७ मे २०२६ रोजी संमेलनाध्यक्षा साहित्यिक प्रतिभा खैरनार यांच्या शुभहस्ते दिला जाणार आहे. कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रम व कथालेखन करिता आजवर अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.

बाळासाहेब देशमुख यांचे .. रंग माझा वेगळा ,माणसे अशी.. अन् तशीही..,माणसे भिंगातून..,हे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.रंग माझा वेगळा या कथासंग्रहास, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे, वाचन संस्कृती प्रतिष्ठान श्रीरामपूर या संस्थेचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. माणसे अशी .. अन् तशीही.. या पुस्तकास, कथालेखक कै. शंकर पाटील राज्यस्तरीय पुरस्कार कोल्हापूर मिळालेला आहे.

या पुरस्काराबद्दल बाळासाहेब देशमुख यांचे साहित्यिक वर्तुळातून अभिनंदन होत आहे.

## विजयपथचा मार्ग – जैन भागवती दीक्षा

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** प्रत्येक व्यक्ति हा सुखाच्या शोधात भटकत आहे. परंतु शाश्वत सुखाचा मार्ग भोगोपभोग नसून त्याग – संयमात दडलेला आहे. सद् गुरूच्या सानिध्यात जेव्हा याची जाणीव होते, तेव्हा वैराग्य प्राप्ती होऊन मनुष्य संयम साधनेसाठी प्रवृत्त होतो. जैन धर्मात संसाराचा त्याग करुन आजीवन भगवान महावीर स्वामींनी सांगितलेल्या अहिंसा, सत्य इत्यादी पाच महाव्रतांचे पालन करण्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. मोक्षप्राप्ती साठी जैन भागवती दीक्षा हा एकमेव सुंदर मार्ग आहे.

पिंपळगाव बसवंत येथील श्रीमती विजयाजी प्रकाशचन्दजी कोचर यांनी संसाराची असारता व जीवनाची नश्वरता ओळखून वयाच्या ६५ व्या वर्षी संयम – त्यागच्या मार्गावर जाण्याचा दृढ निश्चय केला आहे. आनंदधाम च्या पवित्र वातावरण महाराष्ट्र प्रवर्तक पू श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक पू श्री आदर्शऋषिजी म सा इत्यादि साधु – साध्वीजींच्या पावन सानिध्यात उपप्रवर्तिनी अरिहंत आराधिका पू श्री कंचनकवरजी म सा यांच्या नेश्राय मध्ये बुधवार, १३ मे २०२६ रोजी वै विजयाजी कोचर यांची दीक्षा समारोह संपन्न होत आहे. सकाळी ९:३० वाजता प्रवचन व दीक्षा विधि प्रारंभ होईल.

तरी सर्व श्रावक – श्राविकांनी जरुर उपस्थित राहून संयम अनुमोदनेचा लाभ घ्यावा, असे श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## स्व.रावसाहेब गारुडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत चारा वाटप

### हिंदू संस्कृतीनुसार गोसेवा हीच खरी ईश्वर सेवा–हभप बाळकृष्ण महाराज खेसे



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्व.रावसाहेब गारुडकर संत दासगणू महाराज यांचे नित्सिम भक्त होते.संत दासगणू महाराज यांच्या कार्याचा प्रचार प्रसार व्हावा.या उद्देशाने गारुडकर यांनी अकोळनेर येथील संत दासगणू महाराज यांच्या मंदिरासाठी पाठपुरावा करून क वर्ग तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत निधी उपलब्ध करुन सभामंडप निर्माण केला आहे. स्व.गारुडकर यांच्या पाठपुराव्यामुळे शिर्डी संस्थांनच्या वतीने दरवर्षी संत दासगणु महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त शाल पुष्पहार अर्पण करण्यात येते. तसेच अकोळनेर येथे संत सावता महाराज मंदिराची उभारणी केली. स्व.गारुडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त इसळक येथील गोशाळेस चारा वाटप केला आहे.हिंदू संस्कृतीनुसार गोसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. गारुडकर परिवाराचे सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान आहे.असे प्रतिपादन निंबळक श्री क्षेत्र धरमपूरी येथील ह भ प बाळकृष्ण महाराज खेसे यांनी केले आहे.

इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत स्व. रावसाहेब गारुडकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त गोशाळेस चारा वाटप करण्यात आला.याप्रसंगी श्रीक्षेत्र धरमपूर येथील हभप बाळकृष्ण महाराज खेसे,सुनील गारुडकर,चि.वैभव गारुडकर,चि.स्तवन अनारसे,विशाल भालसिंग, निसर्ग सृष्टी गोपालन संस्थेचे सचिव गौतम कराळे आदी उपस्थित होते.

## नगरमध्ये अन्नपुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांचे उत्साहात स्वागत, विविध विषयावर चर्चा

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** प्रतिनिधी –अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र राज्याचे अन्न , नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचे व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमस्थळी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने समता परिषदेचे नेते रामदास फुले यांनी दोन्ही मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.


कार्यक्रमात बोलताना नामदार छगन भुजबळ यांनी सामाजिक एकात्मता, शिक्षण आणि सर्वसमावेशक विकास यावर विशेष भर दिला. समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध योजनांद्वारे कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेत समाजहितासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

छगनराव भुजबळ यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परंपरेचा उल्लेख करत समता, बंधुता आणि लोकशाही मूल्ये जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विविध समाजघटकांना एकत्र घेऊन विकास साधणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी सामाजिक संघटनांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी छगनराव भुजबळ यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढत त्यांच्या नेतृत्वाविषयी विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी, प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, नंदनवन उद्योग समूहाचे दत्ता जाधव ,समता परिषदेचे नेते रामदास फुले, भरत गारुडकर, प्रसाद भडके, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, समता परिषदेचे महानगर जिल्हा अध्यक्ष ब्रिजेश ताठे, माजी सभापती सुवर्णा जाधव ,नंदनवन उद्योग समूहाचे बाबासाहेब जाधव ,संजय जाधव ,आदेश जाधव , नेप्तीचे माजी सरपंच अंबादास पुंड, केळ पिंपळगावचे सरपंच सचिन दळवी, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड, प्रा. भाऊसाहेब पुंड, अशोक गवळी, भरत बोडके, भानुदास फुले व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी संयोजकाच्या वतीने उपस्थित त्यांचे आभार मानण्यात आले. नगर शहरात झालेल्या या कार्यक्रमाची राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली.

## थकीत ऊस बिले तात्काळ द्या; अन्यथा तीव्र आंदोलन; अभिजित पोटे यांचा इशारा

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित ऊस बिलांचा प्रश्न गंभीर बनला असून चालू २०२५–२६ हंगामातील थकीत ऊस बिले तसेच मागील २०२३–२४ हंगामातील कुकडी सहकारी साखर कारखान्याचे थकीत पेमेंट अद्याप न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्ष मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनात शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने शासन आणि प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे.

शिवसेना युवा नेते अभिजीत दादा पोटे यांनी या विषयावर आक्रमक भूमिका घेत संबंधित सर्व साखर कारखानदार व प्रशासनाला धारेवर धरले आहे. त्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, ‘‘शेतकऱ्यांच्या हक्काच्या ऊस बिलासाठी वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस निर्णय होत नाही. चालू हंगामातील बिले आणि कुकडी कारखान्याचे मागील हंगामातील थकीत पेमेंट तात्काळ दिले नाही तर शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.’’निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची देणी प्रलंबित आहेत. यामुळे शेतकऱ्यांना शेतीचा खर्च भागवणे, कर्जफेड करणे आणि पुढील हंगामाची तयारी करणे कठीण झाले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, वेळेत बैठक आयोजित न केल्यास शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त केली.

# महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिलांनी संघटित होऊन पुढाकार घ्यावा - जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते

## भाजपा ओबीसी महिला मोर्चा व नगरसेविका मयुरी जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर –** अलीकडील काळात महिलांवर तसेच अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने समाजातील अशा विकृत प्रवृत्तींना रोखण्यासाठी महिलांनी संघटित होऊन पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. भाजपा ओबीसी महिला मोर्चाच्या पदाधिकारी व नगरसेविका मयुरी जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी बोलताना अनिल मोहिते यांनी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असल्याचे सांगत, महिला व लहान मुलींना लैंगिक वासनांचे बळी बनविणाऱ्या नराधमांविरोधात कठोर सामाजिक आणि संघटनात्मक भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली. भाजपा महिला मोर्चाच्या माध्यमातून अशा प्रवृत्तींना धडा शिकविण्यासाठी प्रभावी जनजागृती आणि संघटनात्मक कृती व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात महापौर ज्योती गाडे यांनी नगरसेविका मयुरी जाधव यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला नेतृत्वाखाली सुरू झालेले हे पहिले जनसंपर्क कार्यालय असून, ही संकल्पना इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. महिलांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधित्व अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या पन्नास वर्षांपासून त्यांच्या कुटुंबाला तोफखाना परिसरातील प्रभाग क्रमांक १० मधील नागरिकांची, विशेषतः पद्मशाली समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. आज स्वाती सिरसुल आणि नगरसेविका मयुरी जाधव यांनी एकत्रितपणे जनसंपर्क कार्यालय सुरू करून सामाजिक बांधिलकी जपली असून, त्यांच्या कार्याला आपण कायम सहकार्य करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे आणि भाजपाच्या प्रभारी कालिंदी केसकर यांनी स्वाती सिरसुल यांच्या सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. स्वाती सिरसुल यांच्या मातोश्री शामला बोरा यांनी सन २००१ मध्ये काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षा तसेच पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा म्हणून कार्य केले असल्याचे सांगत, त्यांच्याकडून मिळालेला सामाजिक वारसा स्वाती सिरसुल यांना लाभला आहे. त्यामुळे त्यांनी केवळ ओबीसी समाजापुरते कार्य मर्यादित न ठेवता संपूर्ण शहराच्या प्रश्नांकडे लक्ष देऊन काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ज्योती दांडगे, जिल्हाउपाध्यक्षा श्वेता झोंड, सावेडी मंडल अध्यक्षा रेणुका करंदीकर, अमृता जाधव ,सुरेखा जंगम, भारती शेवते, पद्मा रजपूत, अर्चना बनकर, रजनी भंडारी, अंजली भोसले, रेखा मैड, विद्या शिंदे, राणी बदाने, पोर्णिमा संदुपटला , उज्वला भांगे, स्वाती पावले, कविता जाधव, ज्योती बिजा, रेणुका गाली, सोनाली चौरे , सुनिता कुरापट्टी, भाजपा युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. रुद्रेश अंबाडे, ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेश विद्ये, भाजपा अनुसूचित मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड , सुरज जाधव, सारंग पंधाडे, संदीप जाधव, अजय ढोणे, ॲड. राजू गाली, अड. यश पंधाडे , सुशांत जाधव , यांच्यासह अनेक पदाधिकारी, नगरसेवक आणि नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे पुणे येथून कार्यक्रमासाठी भाजपा पुणे शहर उपाध्यक्ष महेश चलमल, महाराष्ट्र राज्य वधू-वर सूचक मंडळ आणि पुणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रच्चेवार तसेच भवानी पेठ पद्मशाली पंच कमिटीचे सहसचिव विलास मध्येल हे विशेष उपस्थित होते. त्यांनीही आपल्या मनोगतातून सामाजिक संघटन आणि महिला नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले.

# सत्तेत असूनही अनुदान आणता येत नाही म्हणून शहराला १००० कोटींचे कर्जबाजारी करण्याचा उद्योग - किरण काळे

## आज पे अँड पार्कची लूट, उद्या प्रत्येक श्वासावर कर लावतील, काळेंचा घणाघात

## महापालिकेकडे पगाराचे पैसे नाहीत आणि सत्ताधारी घेतायत साडेपाचशे कोटींचे कर्ज, ठाकरे शिवसेनेचा विरोध

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेने ''अर्बन चॅलेंज फंड'' अंतर्गत तब्बल ५३८ कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची तयारी सुरू केली आहे. पाणी योजनेसाठी त्यात ३७५ कोटींच्या कर्जाचा घाट घातला जात आहे. तब्बल १००० कोटींच्या कर्जाचा घाट म्हणजे शहराला कर्जाच्या खाईत ढकलण्याचा सत्ताधाऱ्यांचा धोकादायक डाव आहे. गल्ली ते दिल्ली सत्ता असून देखील त्यांना अनुदान आणता येत नाही. म्हणून शहराला कर्जबाजारी करण्याचा उद्योग सुरू आहे.

मनपाकडे साधे पगाराचे, विज बिल भरण्याचे पैसे नाहीत. आज पे अँड पार्कची लूट सुरू आहे. उद्या तर हे नगरकरांच्या प्रत्येक श्वासावर कर लावतील, अशी घणाघाती टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे. मनपाच्या कर्ज घेण्याच्या योजनेला ठाकरे शिवसेनेने कडाडून जाहीर विरोध केला आहे. १००० कोटींच्या कर्जातून टेंडरच्या माध्यमातून ठेकेदार, सत्ताधारी, राजकीय पदाधिकारी श्रीमंत होतील. पण शहर कायमचे रसातळाला जाईल, अशी भीती काळे यांनी व्यक्त केली आहे.

यावाबत बोलताना काळे म्हणाले, पाणी व भुयारी गटर योजनेच्या नावाखाली महापालिकेवर प्रचंड आर्थिक बोजा टाकण्याचा प्रकार सुरू असून महापालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता हे नियोजन पूर्णपणे आत्मघातकी आहे. आज वीज बिल, कर्मचारी पगारासाठी आर्थिक खळखळाट सुरू आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी वसुली कोलमडलेली आहे. निधी अभावी रस्त्यांची कामं रखडली आहेत. अशा परिस्थितीत जागतिक बँक व अन्य वित्तीय संस्थांकडून सुमारे १००० कोटी रुपयांचे कर्ज घेणे म्हणजे शहराच्या



भवितव्याशी खेळ करण्या सारखे असल्याचा गंभीर आरोप काळेंनी केला आहे.

**आधी योजनांचे प्राधान्यक्रम ठरवा :**

पिण्याच्या पाण्यासाठी सावेडी, फेज टू. अमृत योजनेवर यापूर्वी कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे उपसा करण्याची क्षमता वाढली आहे. सुमारे पाच लाख लोकसंख्येसाठी पाणी वितरण करून देखील यातून पाणी उरेल एवढी क्षमता आहे. मात्र प्रत्यक्षात नगरकरांना आजही दिवसा आड, तर काही भागांत तीन-चार दिवसांनी, तेही कमी दाबाने पाणी वितरित केले जाते. काही भागात तर आजही टँकर सुरू आहेत. असं असताना ४९५ कोटींची नवी पाणी योजना करणे म्हणजे जुन्या योजनांच्या अंमलबजावणीतील अपयश झाकण्या साठीचा हा घाट असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. आजही सावेडी, बोल्हेगावसह अनेक भागांमध्ये भुयारी गटारी योजना राबविणे बाकी आहे. या कामासाठी प्राधान्य द्यावे, असे काळे यांनी म्हटले आहे. मात्र त्यासाठी कर्ज नव्हे तर आपले राजकीय वजन वापरून शंभर टक्के अनुदान सत्ताधाऱ्यांनी आणून दाखवावे, असे आव्हान काळे यांनी दिले आहे.

**देवाभाऊ, तुमच्या आश्वासनाचे काय ? :**

मनपा निवडणूक प्रचार सभे वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहर पाणी योजनेसाठी राज्य सरकारच्या वतीने नगरोत्थान योजनेतून सुमारे ४९५ कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र देवा भाऊंच्या घोषणेतील एक छदामही शहराला मिळालेला नाही. आश्वासनांना भुलून नगरकरांनी सत्ताधाऱ्यांना मनपात एका हाती सत्ता दिली. सत्ताधाऱ्यांकडे पाशवी बहुमत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत एकहाती सत्ता आहे. मग राज्य आणि केंद्र सरकारकडून अनुदान आणण्याऐवजी जनतेच्या माथी कर्जाचा डोंगर का लादला जात आहे? असा सवालही काळे यांनी उपस्थित केला आहे.

**ठेकेदारांच्या टोळ्या नागरिकांचे जगणे असह्य करतील :**

सध्या शहरात ''पे अँड पार्क''च्या नावाखाली सुरू असलेली अक्षरशः लूट नागरिक अनुभवत आहेत. व्यापारांसह सामान्य नगरकरांचा देखील याला कडाडून विरोध आहे. उद्या शेकडो कोटींचे कर्ज फेडण्यासाठी याच पद्धतीने मनपाच्या नावाखाली वेगवेगळे कर, शुल्क, दंड आणि वसुली लादून राजकीय गुंड आणि ठेकेदारांच्या टोळ्या नागरिकांचे जगणे असह्य करतील, असा इशारा किरण काळे यांनी दिला. विकासाच्या नावाखाली सुरू असलेले हे आर्थिक षडयंत्र शहराची आर्थिक घडी कायमची कोलमडून टाकू शकते, असे ते म्हणाले.

**वेळप्रसंगी जन आंदोलन छेडण्याचा ठाकरे शिवसेनेचा इशारा :**

ठाकरे शिवसेनेचा या नियोजनशून्य, शहर विरोधी आणि आत्मघातकी निर्णयाला तीव्र विरोध राहील. शहराला आर्थिक विनाशाकडे नेणाऱ्या या कारभारा विरोधात वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून ठाकरे शिवसेना तीव्र जनआंदोलन छेडले, असा गर्भित इशारा किरण काळे यांनी दिला.

# श्री समर्थ विद्या मंदिराचा दहावीच्या निकालात घवघवीत यश

## ९३.८१ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम; विद्यार्थ्यांच्या यशाने परिसरात आनंदोत्सव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर –** शिक्षण क्षेत्रात सातत्याने गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या श्री समर्थ विद्या मंदिर माध्यमिक विभाग, सांगळे गल्ली, अहिल्यानगर या विद्यालयाने सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९३.८१ टक्के निकालाची दैदीप्यमान परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या अभूतपूर्व यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यालयातून एकूण ९७ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९१ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे २० विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन प्राप्त करत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला. तसेच ४१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ४ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश मिळविले. विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख सातत्याने उंचावत असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रेया प्रफुल्ल दांगट हिने ९०.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कु. साईशा अभिजीत मालवंडे हिने ८७ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक संपादन केला. तर कु. मुग्धा विजय धात्रक आणि सारंग अनिल जोशी यांनी प्रत्येकी ८६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकावर संयुक्तपणे स्थान मिळविले. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यालयाच्या या यशामागे शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन, सराव परीक्षा, शंका निरसन उपक्रम आणि अभ्यासाचे प्रभावी नियोजन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून उत्कृष्ट निकाल साध्य झाला.

या यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर येथील सर्व माननीय पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य तथा शालेय समिती चेअरमन मा. श्री स्वप्निल कुलकर्णी यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली विद्यालयाने गुणवत्ता वृद्धीचे अनेक उपक्रम राबविले. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होऊन उत्कृष्ट निकाल साध्य करण्यास मदत झाल्याचे शिक्षकांनी सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. सुनील कानडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पित अध्यापन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले आहे. पुढील काळातही विद्यालयाची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे हे यश संपादन करता आले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेतलेली मेहनत आणि शैक्षणिक बांधिलकी याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

विद्यालयाच्या या उज्ज्वल यशाबद्दल परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक संघटनांकडून अभिनंदन करण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# उगवत्या पिढीला घडविण्याचे व्यक्तिमत्व शिबिराचे कार्य प्रेरक – उद्योजक हेमंत लोहगावकर

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित २८ व्या बालकांच्या व्यक्तिमत्व विकास शिबिराच्या समारोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** इंटरनेट मोबाईलच्या मायाजाळात बुद्धी कुंठीत होत असताना उगवत्या पिढीला सुंदर मूर्तीमधे घडविण्याचे अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व्यक्तिमत्व विकास शिबिराचे कार्य प्रेरक असल्याचे प्रतिपादन माय टिफिनचे संचालक उद्योजक हेमंत लोहगावकर यांनी केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित २८ व्या बालकांच्या व्यक्तिमत्व विकास शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित विद्यार्थी व पालकांशी सुसंवाद साधताना बोलत होते.



यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, शिबिराच्या संयोजिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख किरण आगरवाल. ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल,पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी ''जिल्हा वाचनालयाच्या वतीने चार मे पासून सुरू झालेल्या या शिबिरात प्रसिद्ध खडू शिल्पकार श्री अशोक डोळसे, माणुसकीची शाळा चे शिवाजीराव नाईकवाडी, रेघोट्याकार साधना कसपटे -महानोर, नलिनी भालेराव, शितल पांढरे ,प्रा. ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, सौ ज्योती वाळिंबे ,मयूर कांगुळे , कल्पेश शिंदे, प्रा. स्वाती अहिरे यांनी कला साहित्य, संस्कार, वाचन ,आरोग्य, खेळ यावर सहभागी विद्यार्थ्यांना झालेले मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले असल्याचे सांगितले .

याप्रसंगी शिबिरामध्ये सहभागी झालेल्या बालकांच्या कलागुणांनी, लेखन साहित्याने सजलेल्या वृत्तपत्राचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कुमारी अद्या वाळिंबे, आरोही राहींज ,पालक मयूर कांगोळे, ज्योती वाळिंबे यांनी मनोगते व्यक्त केले.

मान्यवरांचा परिचय शिल्पा रसाळ ,सन्मान दिलीप पांढरे यांनी आभार किरण आगरवाल यांनी मानले .शिबिर यशस्वीतेसाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी वर्षा जोशी संजय गाडेकर, आशिष तरोटे ,संकेत फाटक,आर्यन मडुर ,शेख सिकंदर यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

# महिला डॉ. गौरी चौरे आत्महत्या प्रकरणी गोरगाव ग्रामस्थ आक्रमक

## तीन दिवसांत आरोपींना अटक करण्याचे डि.वाय. एस.पी. वमणेंचे आश्वासन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर –** गोरगाव येथील महिला डॉ. गौरी सुनील चौरे आत्महत्या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने संतप्त नागरिकांनी आज पारनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन छेडले. दहा दिवस उलटूनही पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिक, नातेवाईक व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यात जमा झाले होते. ''आरोपींना तात्काळ अटक करा'' तसेच ''पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महिला डॉ. गौरी चौरे हुंड्यासाठी व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी आरोपी अद्याप फरार असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. आंदोलनामुळे पोलीस ठाणे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पोलिस प्रशासनाला दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. पहिल्या निवेदनात संबंधित महिला डॉ. गौरी चौरे गोरेगांव येथे आत्महत्या केल्याचा उल्लेख करत तिच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पती, सासू व सासऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपी खुलेआम फिरत असून त्यामुळे पुरावे नष्ट होण्याची तसेच पीडित कुटुंबीयांवर दबाव येण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. आरोपींना त्वरित अटक करून कठोर शिक्षा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या विलंबित कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. ''महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये तत्काळ कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणात दहा दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने जनतेचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होत आहे,''तसेच या प्रकरणाचा वेगाने तपास करून पीडितेला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनाची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तातडीने डि. वाय.एस.पी. शिरीष वमणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची गंभीरता निदर्शनास आणून दिली. डी. वाय एस.पी. वमणे हे तातडीने पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झाले व त्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा करून येत्या तीन दिवसांत संबंधित आरोपींना अटक करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले.

# अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाची वसंत व्याख्यानमाला गुरुवार दिनांक १४ मे पासून सुरु

## योगेश सोमण,अनघा तांबोळी,शरद तांदळे,वंदना बोकील- कुलकर्णी यांचा सहभाग



मा.श्री.योगेश सोमण (अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे)



मा. अनघा तांबोळी (कवयित्री, मुंबई)



मा.श्री. शरद तांदळे (सुप्रसिद्ध लेखक, पुणे)



मा.सौ. वंदना बोकील कुलकर्णी (सुप्रसिद्ध लेखिका, पुणे)

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर –**अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने गुरुवार दि.१४ मे ते रविवार दि.१७ मे या कालावधीत वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याखानमालेत योगेश सोमण,अनघा तांबोळी,शरद तांदळे,वंदना बोकील- कुलकर्णी विविध विषयावर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली.

ही व्याख्यानमाला रोज सायंकाळी ६ वा. नेता सुभाष चौक, चितळे रोड,वरील वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होईल. व्याख्यानमालेचे उद्घाटन गुरुवार दि. १४ मे रोजी सायं ६ वा.रामदास शिंदे निरीक्षक जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या हस्ते होणार आहे.

उद्घाटनानंतर प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण,(अध्यक्ष,महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे) माझ्या भूमिकांनी मला काय दिले? या विषयांवर पहिले पुष्प गुंफतील.अभंग तुकाराम, उरी,दृश्यम-२,आनंदी गोपाळ या चित्रपटात तसेच विविध मालिका मध्ये त्यांनी भूमिका साकारल्या आहेत.स्नेह संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्ष ते विविध सांस्कृतिक उपक्रम राबवित आहेत.

शुक्रवार दिनांक १५ मे रोजी अनघा तांबोळी,(कवयित्री,मुंबई) यांचा केवल प्रयोगी हा कथा ,विनोद ,किस्से,कवितांवर आधारित कार्यक्रम होईल. या विषयांवर त्या दुसरे पुष्प गुंफतील. त्यांचे दोन कथा संग्रह व चार कविता संग्रह प्रसिद्ध आहे.सध्याच्या आघाडीच्या संवेदनशील मनाच्या आणि ओघवती भाषा शैलीच्या लेखिका आणि कवियत्री आहेत.

शनिवार १६ मे रोजी सुप्रसिद्ध लेखक शरद तांदळे हे ''वाचन''- व्यक्तिमत्वाची जडणघडण या विषायावर तिसरे पुष्प गुंफतील. मराठी लेखक, उद्योजक, प्रेरणादायी वक्ते आणि प्रकाशक म्हणून ओळखले जातात. शरद तांदळे हे लंडन येथील '' २०१३''या पुरस्काराचे मानकरी आहेत . त्यांना हा सन्मान ब्रिटनचे युवराज प्रिन्स चार्ल्स यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांची ''रावण राजा राक्षसांचा'' आणि ''द आंत्रप्रेन्युअर ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

१७ मे रोजी प्रसिद्ध लेखिका डॉ.वंदना बोकील-कुलकर्णी ख्यातनाम लेखिका अरुणा ढेरे यांच्या सीतेची गोष्ट अभिवाचन करीत व्याखानमालेचे चौथे व अखेरचे पुष्प गुंफतील. कुलकर्णी या समीक्षक,लेखक, संपादक म्हणून गेली २० पेक्षा अधिक वर्षे कार्यरत आहेत. शिल्पकार- चरित्रकोश नाट्यखंड पृष्ठे ७५०- सहसंपादन प्रकाशित झाले आहे.संवादसेतू या दिवाळी अंकाच्या संपादक आणि 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाच्या शैली संपादक आहेत.विविध कोशांमध्ये नोंदलेखन केले आहे.

वाचनालयाच्या वसंत व्याखानमालेस रसिकांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन उपाध्यक्ष अनंत देसाई व दिलीप पांढरे, सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर, खजिनदार तनवीर खान,संयोजक किरण आगरवाल,शिल्पा रसाळ,प्रा.ज्योती कुलकर्णी,सदस्य,निमंत्रित सदस्य यांनी केले आहे.